**प्रेस नोट** दिनांक. ०३/०६/२०२४

**आरोपी लोकसेवक :- दत्तू रामभाऊ सोनवणे, वय ४९ वर्षे, पद उप अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, परभणी (वर्ग २), रा.माऊली निवास, अष्टविनायक नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक, ह.मु लोकमान्य नगर, परभणी यांनी १०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याने एसीबी परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | **दत्तू रामभाऊ सोनवणे, वय ४९ वर्षे, पद उप अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, परभणी (वर्ग २), रा.माऊली निवास, अष्टविनायक नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक, ह.मु लोकमान्य नगर, परभणी** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रु. मागणी करून तडजोड अंती ७०००/- रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविली. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी सन २००४ मध्ये परभणी शहर महानगरपालिका हद्दीत सर्व्हे क्रमांक ३०३ मध्ये प्लॉट खरेदी केलेला आहे. तक्रारदार यांचे प्लॉट करिता नवीन मिळकत क्रमांक देऊन पी.आर. कार्ड बनवून देण्यासाठी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, परभणी यांनी आदेश दिलेले आहेत.

सदर आदेशानुसार नवीन मिळकत क्रमांक व पी.आर. कार्ड मिळणे करिता तक्रारदार यांनी उप अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, परभणी यांचे कार्यालयात दि. २९/११/२०२३ रोजी अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावरून काम झाले का नाही, याबाबत तक्रारदार यांनी वेळोवेळी आलोसे सोनवणे यांचेकडे विचारणा केली परंतु त्यांना नंतर या असे सांगितले जात होते.

दि.०७/०५/२०२४ रोजी तक्रारदार यांनी आलोसे सोनवणे यांची भेट घेऊन त्यांचे प्रलंबित कामाबाबत विचारले असता आलोसे सोनवणे यांनी त्यांना १०,०००/- रु. लाचेची मागणी केली. ही रक्कम लाच असल्याने व तक्रारदार यांना द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी दि. २७/०५/२०२४ रोजी एसीबी परभणी येथे तक्रार दिली.

दिनांक २७/०५/२०२४ रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आलोसे सोनवणे यांनी तक्रारदार यांचे प्लॉट करिता नवीन मिळकत क्रमांक देऊन पी.आर. कार्ड देण्यासाठी तडजोडी अंती ७०००/- रु. लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.

आज दि. ०३/०६/२०२४ रोजी सापळा कार्यवाही आयोजित करून आलोसे दत्तू सोनवणे, उप अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, परभणी यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पो.स्टे. नवामोंढा, परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे पोलीस उप अधिक्षक श्री. अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक श्री.सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक श्री.बसवेश्वर जकिकोरे व टिम एसीबी परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री. बसवेश्वर जकिकोरे,पोलीस निरीक्षक लाप्रवि युनिट,परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फ्री क्रमांक:- 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find office Loaction on Google Map & Mappels india Map |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner